## c) भारतीय संसदीय लोकशाही :

## (Indian parliaments are democratic):

## 3.3 न्यायपालिका - संरचना आणि शक्ती, न्यायिक पुनरावलोकन आणि सक्रियता ,जनहित याचिका :

## ( Judiciary- Structure and Powers ,Judicial Review and Activism, Public Interest Litigation):

भारतीय घटनाक्रयांनी लोकशाही व संघराज्यीय शासनाचा स्वीकार केल्यामुळे स्वतंत्र व स्वायत्त न्यायव्यवस्था अटळ बनली. त्यामुळेच घटनेत न्याय यंत्रणेची सविस्तर तरतूद केलेली आहे. तथापि भारतीय न्यायव्यवस्था एकात्म स्वरूपाची आहे. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि दुय्यम न्यायालये अशी न्यायव्यवस्थेची रचना केलेली आहे. १९३५ च्या कायद्यान्वये न्यायमंडळाचे एकात्म स्वरूप स्वीकारण्यात आले आहे. म्हणजेच भारतात संघराज्य पद्धती असून देखील एकात्म व एकेरी स्वरूपाची न्यायव्यवस्था स्वीकारण्यात आली आहे. खालील प्रमाणे न्यायपालिका व तिचे स्तर मुद्द्यांद्वारे स्पष्ट करता येतील.

### A) सर्वोच्च न्यायालय:

### (Supreme court):

२८ जानेवारी १९५० रोजी सर्वोच्च न्यायालय अस्तित्वात येऊन कामकाज सुरू झाले. १९३५ च्या कायद्यान्वये स्थापन केलेल्या Federal Court of India याचेच हे नवे रूप आहे. भारतीय घटनेतील कलम १२४ ते कलम १४७ (भाग ५) या तरतुदी न्यायालयाचे संघटन,

स्वातंत्र्य, अधिकार क्षेत्र, अधिकार आणि कामकाज इत्यादींशी संबंधित आहे. भारतीय संसदेला त्यात बदल करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

**⁎रचना:**

**( Structure)**

कलम १२४ अन्वये सर्वोच्च न्यायालयाची स्थापना व घटना याविषयक तरतूद केली आहे. सद्यःस्थितीत सर्वोच्च न्यायालयाचे एक मुख्य न्यायाधीश आणि ३० इतर न्यायाधीश अशी एकूण ३१ सदस्य संख्या आहे. प्रारंभी ही संख्या ८ होती. १९५६ मध्ये १०, १९६० मध्ये १३, १९७७ मध्ये १७ आणि १९८६ मध्ये २६ करण्यात आली.

**⁎नियुक्ती:**

**(Appoinment):**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपतीमार्फत होते.

> मुख्य न्यायाधीश : सर्वोच्च न्यायालयाचे आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांशी सल्लामसलत करून राष्ट्रपती मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती करतात.

> इतर न्यायाधीश : यांची नियुक्ती राष्ट्रपती मुख्य न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे इतर न्यायाधीश आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्याशी सल्लामसलत करून करतात.

न्यायाधीशांचे निवृत्ती वय ६५ वर्षे असते. तत्पूर्वी राष्ट्रपतीकडे राजीनामा पाठवून तो पदमुक्त होऊ शकतो. सिद्ध झालेले गैरवर्तन वा असमर्थता या कारणांवरून संसदेच्या दोन्ही सभागृहांत उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश बहूमताने त्याला काढून टाकावे अशी शिफारस राष्ट्रपतीस केल्यास राष्ट्रपती त्यांना काढू शकतो. सेवानिवृत्त झालेल्या न्यायाधीशाला भारतातील कोणत्याही न्यायालयापुढे वकिली करण्यास मनाई आहे.

भारताच्या मुख्य न्यायाधीशाचे पद रिक्त झाले असेल वा त्या पदावरील व्यक्ती काही काळासाठी अनुपस्थित वा अक्षम असेल अशावेळी राष्ट्रपती कार्यार्थ मुख्य न्यायाधीशाची नेमणूक करू शकतात. एखाद्या सत्रात गणपूर्ती इतपत न्यायाधीश उपलब्ध नसल्यास राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीने तदर्थ न्यायाधीश नेमण्याचा अधिकार मुख्य न्यायाधीशास असतो.

***न्यायाधीशपदासाठी पात्रता:**

**(Qualifications for a Judge)**

सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नेमले जाण्यासाठी पुढील पात्रता/अटी संविधानाने घालून दिल्या आहेत -

(१) संबंधित व्यक्ती भारताचा नागरिक असावी;

(२) तिला उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा;

(३) तिने उच्च न्यायालयासमोर अधिवक्ता म्हणजे वकील म्हणून किमान १० वर्षे काम केलेले असावे.

- **सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य:**

**(Independence of Supreme Court)**

भारतीय लोकशाही व्यवस्थेत सर्वोच्च न्यायालयाकडे महत्त्वाची भूमिका सोपविण्यात आलेली आहे. सर्वोच्च न्यायालय हे संघीय न्यायालय आहे, ते अपीलांचे सर्वोच्च न्यायालय आहे, नागरिकांच्या मुलभूत हक्कांचे संरक्षक आहे आणि राज्यघटनेचे संरक्षक आहे. त्यामुळे कर्तव्ये जबाबदारीपूर्वक पार पाडता यावीत यासाठी न्यायालयाचे स्वातंत्र्य अत्यावश्यक आहे. कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) आणि कायदेमंडळ (संसद) यांचे अतिक्रमण, दबाव आणि हस्तक्षेपापासून सर्वोच्च न्यायालय मुक्त असावे. कोणत्याही दबावाला किंवा प्रलोभनाला बळी न

पडता न्यायदान करण्यात यावे. सर्वोच्च न्यायालयाल्न स्वातंत्र्याची हमी देण्यासाठी आणि त्यांना निष्पक्षपातीपणे कार्य करता यावे, यासाठी राज्यघटनेने काही संरक्षक तरतुदी केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

(१) नियुक्ती पद्धत - सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती (म्हणजे कॅबिनेट) करतात. ही नियुक्ती न्यायमंडळातील सदस्यांच्या (उदा. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश) मंडळाच्या सल्ल्याने होत असते. ह्या तरतुदीमुळे कार्यकारी मंडळाच्या स्वविवेकाधीन व मनमानी अधिकारावर बंधने येतात. तसेच न्यायालयीन नियुक्त्या ह्या कोणत्याही राजकीय किंवा व्यावहारिक हितसंबंधांच्या आधारावर होत नाहीत, अशीही हमी मिळते.

(२) कार्यकालाची सुरक्षितता सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना कार्यकालाची सुरक्षितता दिलेलीआहे. राज्यघटनेमध्ये नमूद केलेल्या आधाराने आणि पद्धतीनेच राष्ट्रपतीद्वारे त्यांना पदमुक्त करता येते. राष्ट्रपतीने त्यांची नियुक्ती केलेली असली तरी राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत ते पदावर राहतात असे नाही. त्यामुळेच आजतागायत कोणत्याही न्यायाधीशाला पदावरून दूर केलेले (महाभियोगाद्वारे) आढळत नाही.

(३) निश्चित सेवा शर्ती सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे वेतन, भत्ते, विशेषाधिकार, रजा आणि निवृत्तीवेतन इ. संसदेकडून वेळोवेळी निश्चित केले जाते. वित्तीय आणीबाणीचा अपवाद वगळता त्यांच्या नियुक्तीनंतर त्यामध्ये बदल करता येत नाही. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात सेवाशर्ती सुरक्षित असतात.

(४) संचित निधीतून खर्च सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश आणि कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि निवृत्तीवेतन, तसेच न्यायालयाचा प्रशासकीय खर्च संचित निधीतून केला जातो. त्यामुळे खर्चाच्या विषयावर संसदेला मतदान करता येत नाही. (त्याबाबत केवळ चर्चा करता येते.)

५) वर्तणुकीबाबत चर्चा नाही सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आपली कर्तव्ये पार पाडत असताना केलेल्या वर्तनाबाबत संसदेमध्ये किंवा कोणत्याही राज्य विधिमंडळामध्ये चर्चा करण्यास घटनेने मज्जाव केलेला आहे. याला अपवाद म्हणजे संसदेच्या विचाराधीन महाभियोगाचा प्रस्ताव असेल तर त्याबाबत चर्चा करता येते.

(६) निवृत्तीनंतर वकिली करण्यास मनाई निवृत्तीनंतर वकिली करणे किंवा कोणत्याही कोर्टामध्ये किंवा भारतीय भूप्रदेशातील कोणत्याही अधिसत्तेसोबत कार्य करण्यास सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना प्रतिबंध केलेला आहे. भविष्यकालीन लाभाचा विचार करून त्यांनी एखाद्या खटल्यात अनुकूलता दाखवू नये, अशी हमी याद्वारे मिळते.

(७) न्यायालयीन अवमानासाठी शिक्षा – सर्वोच्च न्यायालय तिच्या अवमानासाठी कोणालाही शिक्षा करू शकते. यामुळे तिच्या कृती वा निर्णयांवर टीका केली जात नाही आणि कोणीही त्याला विरोध करू शकत नाही. आपली अधिसत्ता, प्रतिष्ठा आणि सन्मान अबाधित राखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयांना हा अधिकार दिलेला आहे.

(८) कर्मचारी नियुक्तीचे स्वातंत्र्य कोणत्याही प्रकारे कार्यकारी मंडळाच्या हस्तक्षेपाशिवाय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू शकतात ते त्यांच्या सेवाशर्तदिखील निश्चित करू शकतात.

(९) न्यायाधिकार क्षेत्राचा संकोच करता येणार नाही सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिकारक्षेत्र किंवा अधिकार कमी करण्याची अधिसत्ता संसदेला नाही. विविध स्वरूपाच्या न्यायाधिकारक्षेत्राची हमी राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयाला दिलेली आहे. तथापि संसद न्यायालयाच्या न्यायाधिकार क्षेत्रात वाढ करू शकते.

(१०) कार्यकारीमंडळापासून स्वतंत्र – सार्वजनिक हितासाठी राज्यसंस्थेने न्यायमंडळ कार्यकारीमंडळापासून विभक्त/अलग करण्यासाठी पावले उचलावीत, असे निर्देश घटनेने दिलेले आहेत. याचाच अर्थ कार्यकारी मंडळाकडे कोणतेही न्यायालयीन अधिकार नसतील, तसेच न्यायालयीन प्रशासनव्यवस्थेत कार्यकारी मंडळाला कोणतीच भूमिका नसेल.

## B) उच्च न्यायालय:

## (High Court):

भारतात सर्वप्रथम १८६२ साली कलकत्ता, बॉम्बे आणि मद्रास या प्रांतांमध्ये उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. १८६६ साली चौथे उच्च न्यायालय अलाहाबाद येथे

स्थापन करण्यात आले. १९५० नंत ब्रिटिश प्रांतातील उच्च न्यायालये संबंधित घटकराज्यातील उच्च न्यायालये बनली राज्यघटनेने प्रत्येक घटकराज्यामी एका उच्च न्यायालयाची तरतूद केलेली होती. परंतु १९५६ सालच्या ७ व्या घटनादरूस्तीने दोन किंवा अधिक घटकराज्ये आणि दोन वा अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांच्यासाठी सामाईकपणे उच्च न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार भारतीय संसदेला देण्यात आलेला आहे. न्यायालयाचे भौगोलिक अधिकारक्षेत्र हे त्या राज्याच्या भूसीमांशी संलग्र असते.

सध्या भारतामध्ये २१ उच्च न्यायालये आहेत. त्यापैकी तीन न्यायालये सामाईक आहेत. दिल्लीसाठी स्वतंत्र असे उच्च न्यायालय आहे. इतर केंद्र शासित प्रदेश हे घटक राज्याच्या न्यायाधिकारक्षेत्रात येतात. राज्यघटनेतील सहाव्या भागामध्ये कलम २१४ ते कलम २३१ मध्ये उच्च न्यायालयांची रचना, स्वातंत्र्य, अधिकार क्षेत्र, अधिकार, कार्यपद्धती आणि तनुषंगिक बाबी नमूद केलेल्या आहेत.

## उच्च न्यायालयाची रचना:

## (Composition of the High Court)

प्रत्येक उच्च न्यायालयामध्ये एक मुख्य न्यायाधीश आणि वेळोवेळी आवश्यकतेनुसार राष्ट्रपतीने नियुक्त केलेले इतर न्यायाधीश असतात. अशाप्रकारे राज्यघटनेने उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या निश्चित केलेली नसून ही बाब राष्ट्रपतींच्या स्वविवेकाधिकारावर सोपविलेली आहे.

- **न्यायाधीशांची नियुक्ती:**
  **(Appointment of Judges)**

उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती करतात. भारताचे सरन्यायाधीश आणि संबंधित घटक राज्यातील राज्यपाल यांच्याशी विचारविनिमय करून राष्ट्रपती उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाची नियुक्ती करतात. इतर न्यायाधीशांच्या

नियुक्तीवेळेस संबंधित न्यायालयातील मुख्य न्यायाधीशाशीही विचारविनिमय केला जातो. दोन किंवा अधिक राज्यांमध्ये सामाईक असलेल्या न्यायालयांबाबत संबंधित सर्व राज्यातील राज्यपालांशी राष्ट्रपती चर्चा करून निर्णय घेतात.

१९९३ च्या 'सेकंड जजेस्' खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की, भारताच्या सर न्यायाधीशांशी सल्लामसलत केल्याशिवाय उच्च न्यायालयातील कोणत्याही न्यायाधीशाची नियुक्ती करण्यात येऊ नये. १९९८ सालच्या 'थर्ड जजेस्' खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने मत व्यक्त केले की, उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत भारताचे सरन्यायाधीश सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ दोन सदस्यीय मंडळाशी सल्लामसलत करतील. अशाप्रकारे, केवळ सरन्यायाधीशाशी केलेला विचारविनिमय पूर्ण ठरत नाही.

***न्यायाधीश पात्रता:**

## (Judge Qualifications)

(१) ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.

(२) तिने भारतातील कोणत्याही न्यायालयात किमान १० वर्षे न्यायिक पदावर काम केलेले असावे.

(३) तिने एखाद्या उच्च न्यायालयामध्ये किमान १० वर्षे वकिली केलेली असावी.

***कार्यकाळ:**

## (Tenure)

राज्यघटनेमध्ये उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाचा कार्यकाळ निश्चित करण्यात आलेला नाही. तथापि, यासंदर्भात खालील चार तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

(१) वयाच्या ६२ व्या वर्षांपर्यंत ते या पदावर राहू शकतात. त्यांच्या वयाबद्दल काही प्रश्न उपस्थित झाल्यासराष्ट्रपती भारताच्या सर न्यायाधीशांशी चर्चा करून निर्णय घेतील. राष्ट्रपतींचा निर्णय हा अंतिम असेल,

(२) राष्ट्रपतींकडे राजीनामा देऊन पद्मुक्त होता येते.

(३) संसदेच्या शिफारशींवरून राष्ट्रपती त्याला बडतर्फ करू शकतात.

(४) संबंधित न्यायाधीशाची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती झाली असल्यास किंवा दुसऱ्या उच्च न्यायालयामध्ये बदली झाली असल्यास त्यांचे पद रिक्त होते.

***बडतर्फी:( (Dismissal)**

राष्ट्रपतींच्या आदेशाने उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना बडतर्फ केले जाते. राष्ट्रपती बडतर्फीचा असा आदेश केवळ संसदेने शिफारस केल्यानंतरच काढू शकतात. त्यासाठी संसदेच्या विशेष बहुमताची गरज असते. म्हणजेच त्या सभागृहातील एकूण सदस्य संख्येचे बहुमत आणि त्या सभागृहातील उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी २/३ सदस्यांचे बहुमत. सिद्ध झालेली गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या दोन आधारे त्याला बडतर्फ केले जाऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणेच आणि त्याच आधारे उच्च न्यायालयातील न्यायाधीशाची बडतर्फी केली जाते.१९६८ सालच्या न्यायाधीश चौकशी कायद्यान्वये उच्च न्यायालयातील न्यायाधीशाच्या बडतर्फीची प्रक्रिया महाभियोगाच्या प्रक्रियेद्वारा नियंत्रित करण्यात आलेली आहे.

(१) बडतर्फीच्या ठरावावर लोकसभेतील १०० सदस्यांनी आणि राज्यसभेतील ५० सदस्यांनी सहया करून तो ठराव सभापती/अध्यक्षांकडे द्यावा लागतो.

(२) सभापती/अध्यक्ष हा प्रस्ताव दाखल करून घेतात किंवा नाकारतात.

(३) प्रस्ताव दाखल करून घेतल्यावर सभापती /अध्यक्ष आरोपांची चौकशी करण्यासाठी एक तीन सदस्यीय समिती स्थापन करतात.

(४) या समितीमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश किंवा एक न्यायाधीश; उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश आणि विशेष प्रावीण्य असलेले न्यायमूर्ती यांचा समावेश असतो.

(५) संबंधित न्यायाधीशाची गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता सिद्ध झाली तर बडतर्फीचा प्रस्ताव संसद विचारार्थ घेते.

(६) दोन्ही सभागृहांनी विशेष बहुतमाद्वारे प्रस्ताव संमत केला तर तो ठराव राष्ट्रपतींकडे पाठविला जातो.

(७) शेवटी संबंधित न्यायाधीशाला बडतर्फ करण्याचा आदेश राष्ट्रपती देतात.

## *वेतन आणि भत्ते:

## ( Salary and Allowances):

उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे वेतन, भत्ते, विशेषाधिकार, रजा आणि सेवानिवृत्ती संसदेकडून वेळोवेळी निश्चित केली जाते. वित्तीय आणीबाणीची स्थिती वगळता त्यांच्या नियुक्तीनंतर त्यांना नुकसानकारक ठरेल अशा पद्धतीने त्यामध्ये बदल करता येत नाही. याशिवाय त्यांना व्यय भत्ते, मोफत निवास, वैद्यकीय सुविधा, वाहन, दूरध्वनी इ. सोयी-सुविधा पुरविल्या जातात.

## *उच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य:

## (Independence of the High Court)

न्यायालयांना आपली घटनात्मक जबाबदारी आणि कार्ये परिणामकारकरीत्या पार पाडता यावीत, यासाठी स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. याकरिता न्यायालये कार्यकारी आणि कायदेमंडळाच्या दबाव आणि हस्तक्षेपापासून मुक्त असावीत. सर्वोच्च न्यायालयाप्रमाणेच उच्च न्यायालयाच्या स्वातंत्र्याची हमी देणारी तत्त्वे घटनेने नमूद केलेली आहेत.

## *उच्च न्यायालयाचे न्यायाधिकार क्षेत्र आणि अधिकार:

## (Jurisdiction and Powers of the High Court)

सर्वोच्च न्यायालयाप्रमाणेच उच्च न्यायालयालाही व्यापक आणि परिणामकारक अधिकार देण्यात आले आहेत. उच्च न्यायालय हे राज्यातील अपिलाचे सर्वोच्च न्यायालय आहे. नागरिकांच्या मूलभूत हक्काचा संरक्षक आणि राज्यघटनेचा अन्वयार्थक आहे. याशिवाय उच्च न्यायालयाला पर्यवेक्षकाची आणि सल्लागाराची भूमिका पार पाडावी लागते. तथापि, उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकार क्षेत्राबाबत आणि अधिकारांबाबत घटनेमध्ये विस्तृत तरतुदी नाहीत. राज्यघटनाः अस्तित्वात येण्यापूर्वी उच्च न्यायालयांचे जे न्यायाधिकारक्षेत्र आणि अधिकार होते, त्याप्रमाणेच स्वातंत्र्योत्तर काळात असतील, असे नमूद केलेले आहे. परंतु, राज्यघटनापूर्व काळात नसलेली एका विषयाची भर राज्यघटनेने घातलेली आहे. त्यानुसार, महसूली विषयांबाबत उच्च न्यायालयाला न्यायाधिकार देण्यात आलेला आहे. इतर तरतुदींच्या माध्यमातून राज्यघटनेने उच्च न्यायालयाला आदेश देणे, पर्यवेक्षण करणे, सल्लाविषयक अधिकार इ. अधिकार दिलेले आहेत. याव्यतिरिक्त, उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारक्षेत्रात आणि अधिकारांमध्ये बदल करण्याचा अधिकार संसद आणि राज्य विधीमंडळांना दिलेला आहे.

उच्च न्यायालयाचे सध्याचे न्यायाधिकारक्षेत्र पुढील बाबींद्वारे नियंत्रित केलेले आहे.

घटनात्मक तरतुदी,अभिलेख, मालकी हक्क, संसदेचे कायदे, राज्य विधीमंडळाचे कायदे, १८६० ची भारतीय दंड संहिता, गुन्हेगारी कार्यपद्धती संहिता (१९७३) आणि १९०८ ची नागरी कार्यपद्धती संहिता इ.

(१) प्रारंभिक न्यायाधिकारक्षेत्र कोणत्याही अपिलाशिवाय वादाचे असे विषय जे केवळ प्रथमदर्शनी उच्च न्यायालयामध्येच दाखल केले जावू शकतात, त्यांचा समावेश प्रारंभिक अधिकारक्षेत्रामध्ये होतो. ते पुढीलप्रमाणे -

> आरमारावर देखरेख, मृत्यूपत्र, विवाह, घटस्फोट, कंपनी कायदे आणि न्यायालयाचा अवमान ड. शी संबंधित बाबी.

> संसद सदस्य आणि राज्य विधिमंडळाचे सदस्य यांच्या निवडणुकीसंबंधीचा वाद.

> महसूल विषय किंवा महसूल जमा करण्याबाबतचा कायदा किंवा केलेली कृती.

> नागरिकांच्या मूलभूत हक्कांची अंमलबजावणी.

> कनिष्ठ न्यायालयांत घटनेच्या अन्वयार्थासंबंधी एखादा खटला असेल तर तो आपल्या अधिकारात घेणे.

> मूळ चार उच्च न्यायालयांकडे (उदा. कलकत्ता, मुंबई, मद्रास आणि दिल्ली) उच्चतम मूल्याचा समावेश असणाऱ्या खटल्याबाबत नागरी अधिकारक्षेत्र आहे.

१९७३ पूर्वी कलकत्ता, बॉम्बे आणि मद्रास या उच्च न्यायालयांकडे प्रारंभिक गुन्हेगारी अधिकारक्षेत्र होते. परंतु १९७३ च्या गुन्हेगारी कार्यपद्धती संहितेमुळे हे अधिकारक्षेत्र पूर्णपणे संपुष्टात आणले आहे.

(२) घटनात्मक उपायांसंबंधी अर्जाचे अधिकारक्षेत्र राज्यघटनेतील कलम २२६ नुसार नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे आणि इतर कारणांसाठी उच्च न्यायालये बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, उत्प्रेषण, प्रतिषेध आणि अधिकारपृच्छा असे आदेश देऊ शकते. 'इतर उद्देशांसाठी आदेश देणे' याचा अर्थ कोणत्याही सामान्य कायदेशीर हक्काच्या अंमलबजावणीसाठी आदेश देता येतात. उच्च न्यायालय केवळ त्यांच्या भौगोलिक अधिकारक्षेत्रातीलच नव्हे तर एखादी घटना तिच्या कार्यक्षेत्रात बाह्य घटकांमुळे घडलेली असेल तर कोणतीही व्यक्ती, अधिसत्ता आणि शासनाला ती आदेश बजावते. (या विधानातील दुसरा मुद्दा १५ व्या घटनादुरूस्तीने (१९६३) समाविष्ट करण्यात आला).

आदेश जारी करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार हा व्यापक नसून सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारांशी (कलम ३२ नुसार) समकक्ष आहे. याचा अर्थ, मूलभूत हक्कांची पायमल्ली झालेला पक्षकार थेटपणे उच्च किंवा सर्वोच्च

न्यायालयाकडे दाद मागू शकतो. तथापि, पटनात्मक उपायांसंबंधी आदेश देण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारापेक्षा व्यापक आहे. कारण, सर्वोच्च न्यायालय केवळ मूलभूत हकांच्या अंमलबजावणीसाठी आदेश देऊ शकते, इतर कोणत्याही कारणासाठी ते आदेश देऊ शकत नाही. म्हणजेच, सामान्य कायदेशीर हक्कांच्या पायमल्लीबाबत सर्वोच्च न्यायालय आदेश देत नाही. चंद्रकुमार वि. भारत संघ (१९९७) या घटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, 'सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे आदेश अधिकारक्षेत्र हे राज्यघटनेच्या मौलिक संरचनेचा भाग आहे. त्यामुळे, घटनादुरूस्ती करूनही हा भाग वगळता येणार नाही.'

(३) अपीलाचे अधिकारक्षेत्र उच्च न्यायालय हे मुख्यतः अपीलाचे न्यायालय आहे. तिच्या कार्यक्षेत्रामध्ये देणाऱ्या कनिष्ठ न्यायालयांच्या निवाड्या-विरोधातील याचिका उच्च न्यायालयात दाखल केल्या जातात. दिवाणी आणि फौजदारी अशा दोन्ही खटल्यांबाबत अपीलाचे अधिकारक्षेत्र उच्च न्यायालयाकडे असते. तिच्या प्रारंभिक अधिकारक्षेत्रापेक्षा अपीलाचे अधिकारक्षेत्र विस्तृत आहे.

अ) दिवाणी खटले उच्च न्यायालयाचे दिवाणी अपीलाचे अधिकारक्षेत्र पुढीलप्रमाणे -

> करारात ठरलेली रक्कम ही अधिक असेल तर कायदा आणि तथ्य या दोन्ही प्रश्नाबाबत जिल्हा न्यायालये, अतिरिक्त जिल्हा न्यायालये आणि इतर दुय्यम न्यायालयांनी दिलेल्या आदेश आणि निकालाविरोधात थेट उच्च न्यायालयामध्ये प्रथम याचिका दाखल करता येते.

> केवळ कायद्याचा प्रश्न (तथ्याचा प्रश्न नव्हे) जिल्हा किंवा इतर दुय्यम न्यायालयांच्या आदेश वा निकालामध्ये अंतर्भूत असेल तर उच्च न्यायालयात दुसरे अपील करता येते.

> कलकत्ता, मुंबई आणि मद्रास उच्च न्यायालयांमध्ये न्यायालयांतर्गत अपीलाची तरतूद केलेली आहे. उच्च न्यायालयाचा जेव्हा एखादा न्यायाधीश खटल्याचा (प्रारंभिक वा अपीलाच्या अधिकार क्षेत्राखालील) निवाडा देतो तेव्हा त्या निर्णयाविरोधात त्याच न्यायालयातील विभागीय खंडपीठाकडे अपील करता येते.

> प्रशासकीय किंवा इतर न्यायाधिकरणांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात त्या राज्यातील उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाकडे (division bench) अपील करता येते. १९९७ साली सर्वोच्च

न्यायालयाने न्यायाधिकरणांना उच्च न्यायालयाच्या घटनात्मक आदेश देण्याच्या (Writ) अधिकार क्षेत्राखाली आणले. त्यामुळे न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरोधात सुरुवातीला संबंधित उच्च न्यायालयाकडे न जाता थेटपणे सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागता येत नाही.

(अ) फौजदारी खटले उच्च न्यायालयाचे फौजदारी अपीलाचे अधिकारक्षेत्र पुढीलप्रमाणे -

> सात वर्षांपेक्षा अधिक काळाच्या कारावासाची शिक्षा सत्र न्यायालय किंवा अतिरक्त सत्र न्यायालयाने दिलेली असल्यास त्या विरोधात उच्च न्यायालयाकडे अपील करता येते. सत्र न्यायालयाने किंवा अतिरिक्त सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा (देहदंडाची) दिलेली असेल तर त्या दोषी व्यक्तीने अपील केले किंवा नाही केले तरी शिक्षेची अंमलबजावणी होण्यापूर्वी तिची निश्चिती उच्च न्यायालयाकडून करण्यात येते.

> फौजदारी कायदे संहितेमध्ये (१९७३) नमूद केलेल्या काही विशिष्ट खटल्यांमध्ये सहाय्यक सत्र न्यायाधीश, महानगरीय दंडाधिकारी किंवा इतर दंडाधिकारी (न्यायिक) यांनी दिलेल्या निवाड्याविरोधात उच्च न्यायालयाकडे अपील करता येते.

C)*__दुय्यम न्यायालय :__

**(Secondary Court):**

प्रत्येक घटक राज्यामध्ये उच्च न्यायालयानंतर दुय्यम न्यायालयांची एक उतरंड आढळते. तिला कनिष्ठ न्यायालये असेही म्हणतात. ही न्यायालये राज्यातील उच्च न्यायालयांना जबाबदार असल्याने त्यांना दुय्यम न्यायालये म्हटले जाते. दुय्यम न्यायालयांची रचना आणि कार्यकारी सत्तेपासून त्यांच्या स्वातंत्र्याची हमी देण्यासाठी राज्यघटनेतील ६ व्या भागामध्ये कलम २३३ ते कलम २३७ अंतर्गत तरतुदी करण्यात आल्या आहेत. (१) जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती उच्च न्यायालयांशी विचारविनिमय करून राज्यपाल जिल्हा. न्यायाधीशांची नियुक्ती, बदली आणि बढती करत असतो. जिल्हा न्यायाधीशपदी निवड होण्याकरिता पुढील पात्रता असणे आवश्यक आहे.

> ती व्यक्ती तत्पूर्वी केंद्र वा राज्य शासनामध्ये सेवारत असू नये.

> त्या व्यक्तीने ७ वर्षे वकिली केलेली असावी.

> तिच्या नियुक्तीसाठी उच्च न्यायालयाने शिफारस केलेली असावी.

जिल्हा न्यायाधीशांमध्ये शहर दिवाणी न्यायालय, अप्पर जिल्हा न्यायाधीश, सह (Joint) जिल्हा न्यायाधीश, सहाय्यक जिल्हा न्यायाधीश, गृह न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, मुख्य इलाखा दंडाधिकारी, अप्पर मुख्य इलाखा दंडाधिकारी, सत्र न्यायाधीश, अप्पर सत्र न्यायाधीश आणि सहाय्यक सत्र न्यायाधीश इ. सर्वांचा समावेश होतो.

(२) इतर न्यायाधीशांची नियुक्ती जिल्हा न्यायाधीशांव्यतिरिक्त राज्याच्या न्यायालयीन सेवेमध्ये एखाद्या व्यक्तीची निवड करण्यापूर्वी राज्यपाल राज्य लोकसेवा आयोग आणि उच्च न्यायालयाशी विचार विनिमय करतात. दुय्यम न्यायालयांवर नियंत्रण

जिल्हा न्यायालयासह इतर सर्व दुय्यम न्यायालयांवर उच्च न्यायालयाचे नियंत्रण असते. दुय्यम न्यायालयांचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी हे अधिकार उच्च न्यायालयाला दिलेले आहेत. दुय्यम न्यायालयाबाबत असलेल्या तरतुदी राज्यातील दंडाधिकाऱ्यांचा कोणताही वर्ग किंवा अनेक वर्गांना लागू करण्याचा अधिकार राज्यघटनेने राज्यपालाला दिलेला आहे.

## * न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार :

## (Right to judicial review)

• अर्थः - केंद्र तसेच राज्यांच्या कायद्यांची तसेच कार्यकारी आदेशांची घटनात्मकता तपासण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारास न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार असे म्हणतात. जर असे कायदे किंवा कार्यकारी आदेश घटनेच्या तरतुदींशी विसंगत (ultra-vires) असल्याचे आढळले तर, ते अवैध, घटनाविरोधी व निरुपयोगी असून त्यांचा प्रभाव शून्यवत (null and void) असल्याचे घोषित करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला असतो.

• सर्वोच्च न्यायालयाला न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यामागे पुढील कारणे आहेतः

i) घटनेच्या सर्वोच्चतेचे तत्व अबाधित ठेवण्यासाठी.

ii) केंद्र व राज्ये यांमधील संघराज्यीय संतुलन राखण्यासाठी.

iii) नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी.

• घटनेमध्ये कोठेही 'न्यायिक पुनर्विलोकन' (judicial review) या शब्दप्रयोगाचा उल्लेख केलेला नसला तरी, घटनेतील विविध तरतुदींच्या आधारे सर्वोच्च न्यायालयाला तो अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे.

• एखाद्या कायद्याच्या किंवा कार्यकारी आदेशाच्या घटनात्मक वैधतेला सर्वोच्च न्यायालयात पुढील आधारांवर आव्हान देता येऊ शकतेः

i) जर तो कायदा/आदेश भाग तीन मधील मूलभूत हक्कांचे उल्लंघन करीत असेल तर, किंवा
ii) Ii) जर असा कायदा करणे किवा आदेश काढणे हे त्या कायदेकारी मंडळाच्या किंवा कार्यकारी मंडळाच्या प्राधिकाराच्या बाहेर असेल तर, किंवा
iii) जर तो कायदा घटनात्मक तरतुदीचे उल्लंघन करणारा असेल तर.

आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांमध्ये आपल्या या अधिकाराचा वापर केला आहे.

## *न्यायालयीन सक्रियता :

## (Judicial activism)

'न्यायालयाची सक्रियता' हे १९८० च्या दशकानंतर भारतीय शासन प्रक्रियेत उदयाला आलेले एक महत्वपूर्ण घटीत आहे. राजकीय जीवनात व्यापक स्तरावर लोकानुरंजनवाद, मूल्यहीनता, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, लोकशाही मूल्यांचा ऱ्हास अशी दुरावस्था निर्माण झाल्यानंतर न्यायालयाने काही महत्त्वपूर्ण निकाल देऊन सामान्य जनतेच्या आकांक्षा उंचावल्या.

आधुनिक लोकशाही राज्याच्या सिद्धांतात कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ या शासनाच्या तीन शाखांवर सत्ताविभाजनाच्या तत्त्वाद्वारे विशिष्ट जबाबदारी सोपविलेली असते. त्याचप्रमाणे कोणत्याही शाखेने परस्परांच्या कार्य क्षेत्रात हस्तक्षेप करू नये अशी तरतूद केलेली असते. म्हणून कोणत्याही शाखेने आपल्या अधिकारांत वाढ करून इतर शाखांपेक्षा वरचढ होण्याचा प्रयत्न करू नये यासाठी सत्ता संतुलन साधलेले असते. मात्र या तीन शाखांपैकी एखादी शाखा आपले सोपवलेले विहीत कार्य योग्य रीतीने पार पाडू शकत नसल्यास, त्यामुळे शासन कारभारात असंतुलन किंवा पोकळी निर्माण होते. २० व्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात तिसऱ्या जगातील लोकशाही राष्ट्रांमध्ये हीच प्रक्रिया घडलेली दिसते. भारतातही कायदेमंडळ आणि कार्यकारीमंडळ आपली जबाबदारी योग्य रीतीने पार पाडताना दिसत नाहीत. संसदेचा खालावलेला दर्जा, शासन कारभारातील मोठ्या प्रमाणात आढळणारा भ्रष्टाचार, गुन्हेगारीकरण, लोकशाही मूल्यांचा झालेला ह्रास इत्यादी बाबींमुळे संसद आणि कार्यकारीमंडळाची कार्यक्षमता घटली. या प्रक्रियेमुळे सामान्य जनता आपल्या आशाआकांक्षांच्या पूर्ततेसाठी न्यायालयाकडे दाद मागू लागली. भारतातील न्यायमंडळाने सुरुवातीच्या काळातील तांत्रिक व अतिवैधानिक दृष्टिकोनाचा त्याग करून सामान्य जनतेच्या अपेक्षांना प्रतिसाद देऊन शासन-प्रशासनाच्या क्षेत्रात आपली सक्रियता वाढविली. यातूनच भारतीय राजकीय पटलावर 'न्यायालयीन सक्रियता' या घटिताचा उदय झालेला दिसून येतो.

**⁎संकल्पना :**

**(Definition):**

ज्या बाबींची पूर्तता करणे ही वास्तविकपणे कायदेमंडळ व कार्यकारीमंडळाची जबाबदारी असते अशा बाबींसंबंधी जेव्हा न्यायालय निर्णय देत असते अशावेळी न्यायालय सक्रिय झाले असे म्हटले जाते. उदा. पर्यावरणाची काळजी घेणे, तुरुंगातील कैद्यांविषयक विविध तरतुदी करणे, विविध प्रकरणांची न्याय्य चौकशी करणे यासारख्या बाबींवर कारवाई करणे हे कार्यकारी व कायदेमंडळाचे काम आहे. मात्र अलीकडील काळात या दोन शाखांच्या निष्क्रियतेमुळे न्यायालय त्याबाबत निर्णय देत असल्याचे दिसून येते.

**संकल्पनेचा विकास:**

**(Concept development)**

१९८० मध्ये घडलेला 'आग्रा सुरक्षा गृह' खटला हे न्यायालयीन सक्रियतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानावे लागेल. आग्रा येथील सुरक्षा गृहातील गैरसोयी आणि अमानवी व्यवस्थेबद्दल कायद्याच्या दोन प्राध्यापकांनी 'इंडियन एक्स्प्रेस' वृत्तपत्राला पत्राद्वारे माहिती कळविली. त्याच वर्षी दिल्ली येथील 'महिला गृहा'तील परिस्थितीबद्दल दिल्ली विधी शाखेच्या एका विद्यार्थ्याने अर्ज दाखल केला, तर तीन पत्रकारांनी स्त्रियांचा बाजार उघडकीस आणून अत्याचारित स्त्रियांना नुकसानभरपाई द्यावी आणि त्यांचे पुनर्वसन करण्याची मागणी केली.

न्यायालयाने अशाप्रकारे पोलीस कोठडीत होणारे मृत्यू, हुंड्याच्या कारणावरून होणारे खून, पोलीस स्टेशनमधील बलात्कार इत्यादी घटनांची दखल घेण्यास सुरुवात केली. पुढे १९९३ या एकाच वर्षात आपल्या महत्त्वपूर्ण निर्णयात श्रीनगर येथील हजरत बल दर्ग्यातील निष्पाप व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्याचा, मुख्य निवडणूक आयुक्तांच्या अधिकारांचे समर्थन करणारा, गंगा नदी आणि ताजमहालास प्रदूषणामुळे धोका पोचवणाऱ्या प्रदूषित कारखाने बंद करण्याचा निर्णय इ. महत्त्वपूर्ण निर्णय दिले.

कार्यकारी सत्तेच्या अधिकारक्षेत्रातील अनेक बाबींविषयी न्यायालय निर्णय देऊ लागले. नरसिंह राव सरकारने इतर वर्गीयांच्या (ओ.बी.सी.) आरक्षणाचा प्रश्न न्यायालयात नेल्यानंतर न्यायालयाने व्ही. पी. सिंगांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय आघाडी शासनाच्या (नॅशनल फ्रंट सरकारच्या) आरक्षणाच्या धोरणाचा पाठपुरावा केला.हवाला खटल्यामध्ये तर न्यायालयाने कार्यकारी शाखेला आपले काम कसे करावे याविषयीच आदेश दिले. या खटल्यात केंद्रीय गुन्हे अन्वेषण शाखेच्या [CBI] प्रमुखांना खटल्याच्या दैनंदिन घडामोडींविषयी सविस्तर माहिती कळविण्याचे आदेश न्यायालयाने दिले. अशाच प्रकारे १९९६ मध्ये ५०० करोडच्या पशुखाद्य घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी गुन्हे अन्वेषण शाखेला हिरवा कंदील दाखविण्याचा आदेशही न्यायालयाने दिला होता. झारखंड मुक्ती मोर्चा खटल्यात गुन्हे अन्वेषण शाखेच्या अधिकाऱ्यांनाच 'न्यायालयाचे अधिकारी' म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

अशाप्रकारे भारतीय राजकीय व्यवस्थेत कायदे व कार्यकारी शाखा यांच्या दुर्बलतेमुळे व निष्क्रियतेमुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचे कार्य न्यायमंडळाने केले आहे. कायदेमंडळ आणि शासन लोकांना रूचणार नाहीत अशाप्रकारचे परखड निर्णय घेण्यास तयार होत नव्हते. याऐवजी लोकानुरंजनवादी धोरणांचा अवलंब सातत्याने करू लागले. परिणामी सामान्य लोक न्यायालयाकडे धाव घेऊ लागले. लोकांच्या या अपेक्षांना दिलेल्या प्रतिसादातून ही संकल्पना पुढे आली.

## *जनहित याचिका:

## (Public Interest Litigation)

१९८० च्या दशकात उदयाला आलेली एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया होय, 'लोकस स्टॅन्डी' या न्यायालयीन प्रक्रियेतील पारंपरिक नियमानुसार ज्या व्यक्ती व गटावर अन्याय झाला असेल त्या व्यक्ती वा गटानेच न्यायालयात जाणे बंधनकारक होते. परतु जनहित याचिकेच्या संकल्पनेने हा नियम अधिक उदार व लवचीक केला. त्यानुसार ज्या व्यक्तीवर अन्याय झाला आहे ती व्यक्ती न्यायालयात जाऊ शकत नाही किंवा त्याला परवडणारे नसेल तर अशा व्यक्तीच्या वतीने जनहितार्थ इतरांना न्यायालयात जाता येते. थोडक्यात, जनहितार्थ याचिका ही न्यायव्यवस्थेने अनुसरलेली अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे गरीब अथवा वंचित घटकांच्या वतीने किंवा सार्वजनिकदृष्ट्या महत्वाच्या विषयांबाबत नागरिकांनी जनहितार्थ सादर केलेले अर्ज दाखल करून घेतले जातात. अशा प्रकरणाविषयी तक्रार अर्ज दाखल करून घेतांना न्यायालयाद्वारे प्रचलित न्यायालयीन प्रक्रियेत लवचीकता आणली जाते आणि प्रसंगी त्यासाठी शुल्कदेखील आकारले जात नाही. या प्रक्रियेलाच काही विश्लेषकांनी न्यायालयीन सक्रियता असे संबोधले आहे. वास्तविक पाहता १९८२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिकेविषयी असे नमूद केले की, 'सध्या गरीब व दुर्बल घटकांच्या समस्या न्यायालयासमोर मांडल्या जात आहेत. त्यामुळे त्यांची दखल घेऊन योग्य प्रतिसाद देण्यासाठी न्यायालयीन पद्धतीत बदल केला पाहिजे. म्हणूनच

सद्यःस्थितीत सार्वजनिक हिताने प्रेरित झालेल्या नागरिकांद्वारा केलेल्या तक्रार अर्जाची दखल घेणे हाच एक उत्तम मार्ग आहे.'

सर्वसाधारणतः जनहितार्थ याचिकेत दोन संदर्भात अर्ज दाखल करता येतात -

(१) ज्या प्रकरणांचा जनहितावर प्रभाव पडू शकतो अशी प्रकरणे.

(२) दारिद्र्य अथवा अज्ञानामुळे आपल्या हक्करक्षणासाठी न्यायालयात जाण्यास असमर्थ असणाऱ्या घटकांचे हित.

या संकल्पनेच्या काही समर्थकांच्या मते सामाजिक न्यायाच्या संकल्पनेतूनच जनहितयाचिका ही कल्पना उगम पावली आहे. भा. ल. भोळे यांनी अधोरेखित केल्याप्रमाणे "सार्वजनिक अन्यायाचे निराकरण, सार्वजनिक कर्तव्यपालनाची सक्ती सामाजिक, सामूहिक आणि विकीर्ण हक्कांचे संरक्षण आणि सार्वजनिक हिताचे संरक्षण या हेतूंनी न्यायालयापुढे उभे केले जाणारे खटले म्हणजे जनहित याचिका होत", अशी एक व्याख्या केली जाते. याद्वारे न्यायालयाने जीविताचा अधिकार, किमान वेतनाचा अधिकार, समान कामास समान वेतन, बालकांचे आर्थिक शोषणांपासून संरक्षण, पर्यावरण संरक्षण, प्राथमिक शिक्षणाचा अधिकार यांसारखे महत्त्वाचे अधिकार आपल्या नाविन्यपूर्ण निर्णयातून प्रस्थापित केले आहेत.

अशाप्रकारे न्यायपालिका व न्यायपालिकेची संरचना तिचे अधिकार नाईक पुनरावलोकन आणि न्यायालयीन सक्रियता व तसेच जनहित याचिका ही वरील मुद्द्यांद्वारे स्पष्ट करण्यात आली आहे.